## “देवटीप”
काठवठीतली भाकर गोल करायच्या नादात...
तव्यावरील भाकर करपुन देऊ नये....
देवटिप -ज्याला समजले नसेल त्याने
स्वतः भाकर थापून पहावीच असा
देवहट्ट नाही.
देवा झिंजाड, कवी, लेखक



आवाज जनमानसाचा!
# मायभूमी न्यूज






■ वर्ष -१५ ■ अंक ३ ■ वारः बुधवार ■ कार्यकारी संपादक : सचिन भालेकर ■ दिनांक : ४ ऑक्टोबर २०२३ ■ मुल्य ५ रुपये ■ R.N.I. No.: MAHMAR/2008/28944


# घाटीमध्ये औषधांअभावी २४ तासात १८ मृत्यू, आरोग्य सुविधांचा खेळ खंडोबा

**छत्रपती सभांजीनगर ■ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे ठाणे, त्यानंतर नांदेड आणि आता छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयातूनही धक्कादायक बातमी समोर आली आहे. संपूर्ण मराठवाडयातील गोरगरीब रुग्णांचा भार असलेल्या संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात २४ तासांत १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयांना पुरवण्यात येणारा अपुरा निधी अपुऱ्या सोईसुविधा, निधीअभावी औषधांचा अभाव, थांबलेली नवीन कर्मचाऱ्यांची भरती असे अनेक मुद्दे ऐरणीवर आले आहेत. अपघात मृतांमध्ये दोन बालकांचा समावेश घाटी रुग्णालय हे छत्रपती संभाजीनगरमधील एक मोठे आणि महत्त्वाचे रुग्णालय आहे. केवळ मराठवाडाच नव्हे तर आसपासचे १२ ते १४ जिल्ह्यातील गोरगरीब रुग्ण या रुग्णालयावर अवलंबून आहेत. दररोज हजारो रुग्ण येथे उपचारासाठी येत असतात. मात्र, घाटी रुग्णालयात मागच्या २४ तासांत १८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये २ बालकांचा समावेश आहे.

गंभीर अवस्थेत झाले होते भरती



दरम्यान, घाटी रुग्णालयात ज्या रुग्णांचा मृत्यू झाला त्यांना इतर रुग्णालयांतून गंभीर अवस्थेत असताना दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. या रुग्णांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? याबाबत अद्याप रुग्णालय प्रशासनाकडून माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, शासकीय रुग्णालयात एवढ्या मोठ्या प्रमाणात रुग्णांचे मृत्यू होत असल्याने चिंता व्यक्त होत असून सामान्यांमधूनही संताप व्यक्त होत आहे.

१५ दिवस पुरेल एवढाच औषधांचा साठा दरम्यान, नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात २४ तासांमध्ये २४ रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या रुग्णालयात दोन महिन्यांपासून अनेक इंजेक्शन व औषधांचा तुटवडा असल्याचे समोर आले आहे. प्रसूतीसाठी आवश्यक कॉटन बंडलही उपलब्ध नसल्याची माहिती आहे. त्याचप्रमाणे घाटी रुग्णालयातही १५ दिवस पुरेल इतकाच औषधांचा साठा असल्याची माहिती आहे.

निधीअभावी औषधांचा तुटवडा राज्य सरकारकडून निधी मिळत नसल्याने शासकीय रुग्णालयांना हाफकिनकडून होणारा औषध पुरवठा सध्या रोखण्यात आला आहे. त्यामुळे राज्यभरातील शासकीय रुग्णालयात औषधांचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे अत्यवस्थ रुग्णांना वेळेत औषधे पुरवठा होत नसल्याने जीव गमवावा लागत असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहे. रुग्णांना बाहेरील खासगी रुग्णालयांमधून महागडी औषधे आणावी लागत आहेत.

अनेक रुग्णांची ही औषधे खरेदी करण्याची ऐपत नसल्याने रुग्णांना जीव गमवावा लागत असल्याचे प्रकार समोर येत आहे. ठाणे, नदिड आणि आता छत्रपती संभाजीनगरसारख्या राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये असे प्रकार घडत असल्याने शासनाचे डोळे आता तरी उघडणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे. शासकीय रुग्णालयांमधील मृत्यूंचे सत्र सुरूच

ठाण्यातील कळवा येथील मनपाच्या रुग्णालयात दोन महिन्यांपूर्वी २४ तासांत १८ रुग्णांचा मृत्यू झाला होता. त्याच्या चौकशीचा अहवाल येऊन दोषींवर कारवाई होण्यापूर्वीच नांदेडमध्ये त्यापेक्षा जास्त प्रमाणात मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.. येथील रुग्णालयात २४ तासांमध्ये २४ रुग्णांचा मृत्यू झाल्या. या घटनेला २४ तास उलटत नाही तोच छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयातही अशीच घटना घडली आहे. हे मृत्यू थांबवण्यासाठी शासन आता काय उपाययोजना करणार, याकडे लक्ष असणार आहे.

## औषधांचा तुटवडा नाही

दरम्यान, राज्यातील शासकीय रुग्णालयांत निधीअभावी औषधांचा तुटवडा पडल्याचे समोर येत आहे. त्यामुळेच. रुग्णांचा मृत्यू झाल्याचा आरोपही करण्यात येत आहे. ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी हाफकिनने औषध खरेदी केल्याने रुग्णालयांत औषधांचा तुटवडा असल्याचा आरोप केला आहे. यावर डॉ. भारती पवार म्हणाल्या, औषधांच्या तुटवड्याबाबत आमच्याकडे काही तक्रार नाही. औषधांचा पुरवठा हाफकिनच्या माध्यमातून सुरु आहे. या व्यतिरिक्त जिल्हा प्रशासनाकडेदेखील यासाठी निधी असतो. त्यामुळे संभाजीनगर आणि नांदेडच्या घटनेत औषधांचा तुटवडा असेल, असे दिसत नाही. नेमके मृत्यू कशामुळे झाले, हे अहवाल आल्यावरच कळेल.

## नांदेड, संभाजीनगरमधील रुग्णांच्या मृत्यूंची ’केंद्राकडून दखल

प्राथमिक माहिती आहे. मात्र या घटनेची सखोल चौकशी केली जाईल. त्याचबरोबर रुग्णालय प्रशासनाकडून याबाबत अहवाल वेद्र मागवला जाईल. अहवाल आल्यानंतर कारवाई डॉ. भारती पवार म्हणाल्या, नांदेड व छत्रपती संभाजीनगरमधील शासकीय रुग्णालयाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी माझे बोलणे झाले आहे. त्यांच्याकडून रुग्णांच्या मृत्यूबाबत खुलासा मागवला आहे. नेमके कोणते पेशंट होते? कधी ॲडमिट झाले होते? ही सर्व माहिती मागविण्यात आली आहे. लवकरच सविस्तर अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

## शासकीय रुग्णालयांवर सरकारचे लक्ष

शासकीय रुग्णालयांच्या दुरावस्थेबाबत डॉ. भारती पवार म्हणाल्या, एनएमसीच्या गाईडलाईन्स असून त्यांच्याकडून सातत्याने शासकीय रुग्णालयांची तपासणी होत असते. चुकीच्या पद्धतीने मेडिकल कॉलेज चालत असेल तर कारवाई केली जाते. जिथे सुविधा नसतील, अशा मेडिकल कॉलेजला परवानगी दिली जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांवर सरकारचे लक्ष आहे.

## केंद्राकडून मदत करणार

केंद्र सरकार राज्यांना आरोग्याच्या बाबतीत मदत करण्यासाठी तत्पर आहे. महाराष्ट्रातील रुग्णालयांनाही केंद्र सरकारकडून मदत केली जाईल, असे आश्वासनही डॉ. भारती पवार यांनी दिले. डॉ. भारती पवार म्हणाल्या, राज्यातील आरोग्य व्यवस्थेसाठी केंद्राकडून निधी दिला जातो. राज्यातील शासकीय रुग्णालयांची माहिती घेऊन केंद्र सरकारच्या माध्यमातून आवश्यक ती मदत दिली जाईल.

# सुप्यात विकास पाण्यात बुडाला

**सुपा ■ अमर भालके**



सुपा नगर-पुणे महामार्गावर सुपा बस स्थानक चौकात महामार्ग तयार करताना पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे हा महामार्ग दरवर्षी पावसाळ्यात पाण्यात बुडत आहे व रोडलगतच असलेले पारनेर तालुक्यातील सुपा बस स्थानकही जलमय होत आहे. येथील पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

सुपा बस स्थानकाच्या एका बाजूला उतार असल्याने दुसऱ्या बाजूचे पाणी चौकात येते, तसेच गावातील शहंजापूर रोड, बाजारतळाकडून येणारे पाणी याच चौकात

### “विकासाचे वाभाडे”

जमा होते. त्यामुळे एकाच वेळी चौकात आलेले हे पाणी एकत्र झाले की, साठवण बंधाऱ्याचे स्वरूप बस स्थानक परिसराला येते. याच चौकातून नागरिक, प्रवासी, शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी, एमआयडीसीमध्ये कामासाठी येणारे व जाणारे कामगार, शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक यांची वर्दळ असते. मात्र, येथे मोठ्या प्रमाणात पाणी साठत -असल्यामुळे जीव मुठीत धरत येथून मार्ग काढावा लागत असल्याचे भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी सांगितले.

चेतक एंटरप्रायझेस या टोल वसूल करणाऱ्या कंपनी प्रशासनाशी सरपंच मनिषाताई रोकडे, भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, माजी तालुकाध्यक्ष सुनील थोरात, सुप्याचे माजी उपसरपंच दत्ता पवार यांनी संपर्क साधून उपाययोजना करण्याबाबत सुचविले.

> सुपा बसस्थानक चौकातून ग्रामपंचायतच्या गटारीचे पाणी पाइपमधून जाते. त्यावर असणाऱ्या टपऱ्यांमुळे ते कोंडल्याने पाणी वाहून जाण्याचा मार्ग बंद झाल्याने पाणी साठते. तरीही आम्ही आमचे इंजिनीअर पाठवून नेमके पाणी कशामुळे साठते ते पाहून आमच्याकडून अडचण असेल, तर ती नक्कीच दूर करू.
>
> **- शंकरराव खोसे, व्यवस्थापक, चेतक एंटरप्रायझेस**

# धनगर समाजाच्या घरकुलांचा प्रश्न सोडविणार

**टाकळी ढोकेश्वर ■ निशिकांत रोहकले**

## नीलेश लंकेः ढवळपुरीत तीन कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

मेंढपाळ व्यवसायासाठी बाहेर फिरणाऱ्या धनगर बांधवांना ऊन, वारा, पावसापासून कोणतेही संरक्षण नसते. पावसापासून संरक्षणाची त्यांची तिथे सोय नसते. गावाकडे आल्यानंतरही तशाच असुविधांशी त्यांना सामना करावा लागतो. धनगर समाजाच्या अडचणी, दुःख काय आहेत, हे मी अतिशय जवळून पाहिले आहे. आगामी अधिवेशनात मेंढपाळ बांधवांच्या घरकुलांचा प्रश्न उपस्थित करणार आहे, असे प्रतिपादन आमदार नीलेश लंके यांनी दिले.



ढवळपुरी (ता. पारनेर) येथे कोटी रुपये किमतीच्या विकास कामांचे भूमिपूजन व ५०० मेंढपाळ बांधवांना ताडपत्र्यांचे आमदार लंके यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते अशोक कटारिया होते.

यावेळी सभापती बाबाजी तरटे, सुदाम पवार, ठकाराम लंके, ॲड. राहुल झावरे, दत्ता कोरडे, संजय लाकुडझोडे, अरुण पवार, भागाजी गावडे, बबन आडसूळ, विजय सासवडे, विकास भागवत, संजय काळे, प्रसाद नवले, विकास शेटे, सरपंच नंदा गावडे, सुखदेव चितळकर, रमेश केदारी आदी उपस्थित होते.

> धनगर बांधवांनी उत्स्फूर्तपणे स्वागत करून सत्कार केला. हा क्षण मी विसरू शकत नाही. प्रेमापोटी मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याची उधळण केली, हे निःस्वार्थी प्रेम आहे. ते विकत मिळत नाही. तुमचे आमचे हे वेगळ, आपुलकीच नात आहे. अनेकदा राजकीय पुढारी आल्यानंतर औपचारिकता म्हणून त्यांचे स्वागत केले. तुमचे हे प्रेम विसरता येणार नाही.
>
> **नीलेश लंके, आमदार**

# अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे करणाऱ्या शिक्षकावर कारवाईसाठी तांबे यांचे ओतूर येथे उपोषण सुरू

**जुन्नर ■ प्रतिनिधी**

ओतूर अल्पवयीन शालेय विद्यार्थिनीचे सोशल मीडियाच्या माध्यमातून लैंगिक शोषण करणाऱ्या ’शिक्षकावर ’पोक्सो’ कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून कडक कारवाई व्हावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तान्हाजी तांबे यांनी ओतूर येथील पांढरी मारुती मंदिराच्या खुल्या व्यासपीठावर बेमुदत दोन दिवसांपासून उपोषण सुरू आहे.

सदर शिक्षकावर कायदेशीर कारवाई व्हावी म्हणून तानाजी तांबे यांनी पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक, तहसीलदार, जुन्नरचे गटशिक्षण अधिकारी, जुन्नरचे उपविभागीय पोलिस अधिकारी, ओतूरचे सहायक पोलिस निरीक्षक व ओतूर

ग्रामपंचायत यांना निवेदन पाठवून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला होता... मात्र, यावर कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे सोमवार २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीच्या दिवशी तानाजी तांबे हे सकाळपासून आमरण उपोषणाला



बसले आहेत, उपोषणस्थळी तालुक्यातील अनेक नागरिकांनी व ओतूर परिसरातील ग्रामस्थांनी भेट देऊन उपोषणाला पाठिंबा दिल्याची माहिती तांबे यांनी दिली. तसेच उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी तब्येत खालवल्यामुळे त्यांना सलाईन लावण्यात आले असून, ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय पथक तांबे यांच्या आरोग्याची तपासणी वेळो-वेळी जाऊन करत आहेत.

# पारनेर तालुक्यातील सात गावांची ग्रामपंचायत निवडणूक जाहीर

पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार, वाडेगव्हाण, काकणेवाडी, यादववाडी, मावळेवाडी, जामगाव, विरोली या गावांची ग्रामपंचायत निवडणूक जाहीर झाली आहे. सहा ऑक्टोबरला निवडणूक नोटीस प्रसिद्ध होईल, १६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर नामा निर्देशन पत्र मागवणे आणि सादर करणे. २३ ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी होईल, २५ तारखेपर्यंत नामनिर्देशन पत्रे

### “रणधुमाळी”



मागे घेता येतील, २५ तारखेलाच निवडणूक चिन्ह देण्यात येईल आणि उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येईल.

५ नोव्हेंबर २०२३ हा मतदानाचा दिनांक असेल आणि त्यानंतर लगेच म्हणजे सहा तारखेला मतमोजणी होईल.नऊ तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मतदानाची अधिसूचना प्रसिद्ध होईल.

अनेकांसाठी राजकीय भवितव्य बनवणेसाठी ग्रामपंचायत निवडणूक लढवणे हे एक स्वप्न असते.अनेक भावी सध्या गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले दिसतात साम-दाम-दंड-भेद वापरत ही निवडणूक होणार याचे चित्र आतापासूनच दिसायला सुरुवात झाली आहे.

# होऊद्या चर्चा अभियानाची निघोज मधून सुरुवात, कारभाऱ्यांचे भांडाफोड, नरेंद्र मोदी आणि भाजपावरील हल्लाबोल



**पारनेर ■ अमर भालके**

लोकप्रिय घोषणा करून सन २०१४ मध्ये सत्तेवर आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या कारभाराचा भांडाफोड करण्यासाठी तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना गुरुवारपासून मैदानात उतरणार आहे. या अभियानाचे नियोजन करण्यासाठी मंगळवारी पारनेर येथे विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजय औटी यांच्या अध्यक्षेतेखाली बैठक पार पडली असून बुधवारी सकाळी साडेआठ वाजता या अभियानास निघोज येथून प्रारंभ करण्यात येणार आहे.

होऊ द्या चर्चा करू या बोलघेवडया योजनांचा भांडाफोड या टॅगलाईन खाली शिवसेनेच्या वतीने एक पत्रक प्रसिध्द करण्यात आले असून या अभियानादरम्यान ते प्रत्येक गावामध्ये घरोघर पोहचविले जाणार असल्याचे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रामदास भोसले यांनी सांगितले. बुधवारी पार पडलेल्या या बैठकीस मा. आ. विजयराव औटी, रामदास भोसले, तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. भास्करराव शिरोळे, महिला आघाडी तालुकाप्रमुख प्रियंका खिलारी, युवा सेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, पोपटराव चौधरी, बाजार समितीचे संचालक किसन सुपेकर, सखाराम उजागरे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

पंचायत समितीच्या निघोज गणातून अभियानास बुधवारी सकाळी साडे आठ वाजता प्रारंभ करण्यात येईल. मा. आ. विजय औटी यांच्यासह शिवसेना, युवा सेना, महिला आघाडीचे पदाधिकारी तसेच शिवसैनिक त्यात सहभागी होणार आहेत. दुपारी १ वाजेपर्यंत पंचायत समिती गणातील सर्व गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येईल. दुपारी १ नंतर अळकुटी पंचायत समितीच्या गणांतील गावांमध्ये अभियान राबविण्यात येणार असल्याचे डॉ. भास्कर शिरोळे यांनी सांगितले.

## हे आहेत वक्ते

विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी, उपनेते भाऊ कोरगांवकर, जिल्हा प्रमुख प्रा. शशिकांत गाडे, उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले, रामदास भोसले, तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, महिला आघाडी प्रमुख प्रियंका खिलारी, युवा सेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, शेतकरी सेना तालुकाप्रमुख गुलाबराव नवले, शिक्षक सेना तालुकाप्रमुख अर्जुन आढाव, वाहतूक सेना तालुकाप्रमुख विनायक सालके, कामगार सेना तालुकाप्रमुख डी. के. पांढरे, उद्योग सेना तालुकाप्रमुख सुभाष रासकर, सोशल मीडिया तालुकाप्रमुख भाऊसाहेब रोकडे, तालुका संघटक अमोल गजरे.

## इंडिया आघाडीचे कारण

३२ टक्के मिळविणारे सत्तेत बसले असून ६८ टक्के मते घेणारे विरोधी बाकांवर बसले आहेत. ३८ पक्षांमध्ये विरोधक विखुरले असल्याने इंडिया आघाडी करून भाजपाला आव्हान देण्यात येणार असल्याचे या पत्रकात नमुद करण्यात आले आहे.

## ९ वर्षात काय झाले ?

ठाकरे सेनेच्या वतीने वितरीत करण्यात येणाऱ्या पत्रकांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. ९ वर्षे झाली काय झाले असा प्रश्न उपस्थित करीत ना शिवस्मारक तयार झाले, ना विश्वगुरू झालो, ना १५ लाख मिळाले, ना काळे धन परत आले, ना रोजगार मिळाले, ना स्त्रियांवरील अत्याचार थांबले, ना दाऊद व मल्यास फरफटत आणले, ना गंगा स्वच्छ झाली, ना स्मार्ट सिटी झाल्या, ना बुलेट ट्रेन धावली, ना दहशतवाद थांबला, ना महागाई कमी झाली, ना पेट्रोल स्वस्त झाले. ना काश्मिरी पंडीत घरी परतले, ना शेतकऱ्यांना दीड पट भाव मिळाला, ना स्टार्ट अप इंडिया झाला, ना मेक इन इंडिया झाला, ना डिजिटल इंडिया झाला, ना अच्छे दिन आले, ना चीन घाबरला, ना धनगर आरक्षण मिळाले, ना डॉलर घसरला, ना डॉ. बाबासाहेब यांचे स्मारक तयार झाले असे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.







मालक मुख्य संपादक रामदास भोसले-प्रकाशक कार्यकारी संपादक सचिन भालेकर - डिजिटल प्रत - बातमी संपर्क ७७११०००५५० Email : info@maibhoominews.com ~ website : www.maibhoominews.com